# Quadrant II – Transcript and Related Materials

**Programme: B.A.**

**Subject: Marathi**

**Paper Code: MRA 101**

**Paper Title: Communication Skills: Comparing**

**Unit: 2 सूत्रसंचालनात कविता कथा सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार इ. वापर**

**Module Name: 1. सूत्रसंचालनात मराठी, इंग्रजी, कोंकणी, हिंदी इ. भाषेतील अवतरणांचा वापर**

**2. हिंदी शेरोशायरींचा वापर**

**Module No: 8**

**Name of the Presenter: Miss. Sonia M. Sawant**

---

## Transcript

उच्च शिक्षण संचालनालयाच्यावतीने शिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत कला शाखेच्या पदवी शिक्षणासाठी मराठी विषयात प्रथम वर्षाच्या संप्रेषण कौशल्य: सूत्रसंचालन या विषयावर आपण शिकून घेणार आहोत.

*रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा*

*गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा*

अशा पद्धतीने ज्याची साऱ्या जगात ओळख आहे, ज्याचा परिचय केला जातो ते म्हणजे सूत्रसंचालक. तर या सूत्रसंचालकाच्या भूमिकेमध्ये वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला काहीतरी गुण जे आहेत ते त्याच्यामध्ये असणे अपेक्षित असतात. आणि ते गुण त्याच्यातला महत्त्वाचा गुण जो आहे तो त्याचा आंतरिक विकास जो आहे तो होणे गरजेचं असतं. आणि या दृष्टीने विविध भाषेतील अवतरणांचा वापर कसा करावा, आपल्या सूत्रसंचालनाच्या संहितालेखनामध्ये कशा पद्धतीने त्याचा वापर जो आहे तो केला जातो याविषयी आज विशेष चर्चा जी आहे ती आपण या भागामध्ये करणार आहोत.

या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून वाचनाचे कौशल्य विकसित होणार आहे. पाठांतराची सवय विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. वैचारिक बुद्धिमत्ता मुलांची विकसित होणार आहे.

सूत्रसंचालन प्रभावी होण्यासाठी त्याला भाषिक विविध सौंदर्यालंकारानी नटवावे लागते. तर हे सौंदर्यालंकार काय आहेत. तर म्हणी, वाक्प्राचार, चारोळ्या, अवतरणे इत्यादी सौंदर्यालंकारांनी सूत्रसंचालन जे आहे ते नटत असतं. कोणताही कार्यक्रम असू द्या, कोणत्याही कार्यक्रमामध्ये सूत्रसंचालक आपली महत्त्वाची भूमिका निभावत असतो. तर या विविध सौंदर्यालकारांच्या माध्यमातून तो सूत्रसंचालन जे आहे ते प्रभावी करत असतो. अवतरणांचा वापर केल्यामुळे सूत्रसंचालन जे आहे ते सुशोभित होण्यासाठी साहाय्य होत असते. सूत्रसंचालकाकडे प्रेक्षकांच्या नजरा आपोआप विशेष वळतात. तर त्याचा उपयोग जो आहे तो काय असतो तर सूत्रसंचालकाकडे प्रेक्षकाच्या ज्या नजरा आहेत त्या विशेष वळतात. जर प्रेक्षक कुठेतरी कुजबुज करत असतील तर हे प्रेक्षक जे आहेत ते आपोआप त्या अशा अवतरणांच्या वापरामुळे अवतरणे जर सूत्रसंचालनामध्ये वापरली तर विशेष त्यांची नजर जी आहे ती वळवून घऊ शकतात. प्रेक्षक अधिक रसिकतेने सूत्रसंचालन ऐकू लागतो. तर याच सगळ्या मुद्द्यावर आधारीत या आलेखातून सूत्रसंचालनात अवतरणांचा वापर कसा करावा त्याचे तंत्र आपण समजून घेणार आहोत. सूत्रसंचालनात वापरण्याचे जे तंत्र आहे म्हणजे **Techniques** आहेत त्या थोडक्यात तुम्हाला सांगण्याचा वापर करेन.

अवतरणांचा वापर करताना त्याचे प्रसंगावधान लक्षात घेऊन त्याचा वापर जो आहे तो करावा लागतो. अवतरणांचा वापर कोणत्याही स्वरूपाच्या कार्यक्रमात करता येतो. सांस्कृतिक कार्यक्रम असल्यास चारोळ्या, सुभाषिते, कविता, अवतरणे या सर्वांचा वापर जो आहे तो करता येतो. परंतु औपचारिक पद्धतीच्या कार्यक्रमात मात्र प्रामुख्याने अवतरणेच जी आहे ती वापरली जातात. म्हणून विशेष हा उपविषय जो आहे तो अभ्यासक्रमामध्ये लावलेला आहे.

अवतरणांचा वापर जो आहे तो कशा पद्धतीने केला जातो किंवा तो कशा पद्धतीने करावा याविषयी विशेष उपविशेष दिलेला आहे. तर ती अवतरणे वापरताना प्रामुख्याने सोपी साधी आणि सरळ असावीत. ठरावीक भाषेवर आपलं प्रभूत्व असावं. कोणतीही भाषा असू द्या. इंग्रजी असू द्या, मराठी असू द्या, कोंकणी असू द्या. कोणतीही भाषा आपण वापरतो ज्या विशिष्ट भाषेमध्ये आपण सूत्रसंचालन करणार आहोत ती भाषा त्या भाषेवर आपलं प्रभूत्व असलं पाहिजे. भाषा शुद्ध असली पाहिजे. ती भाषा आपली ओळखीची असली पाहिजे. ती अधिक परिचयाची असणे आपल्यासाठी गरजेचे आहे. ज्या भाषेतील अवतरणांचा वापर करत असतो त्या भाषा प्रेक्षकांच्या परिचयाच्या असाव्यात. तर ज्या भाषेमध्ये तुम्ही अवतरणं वापरतात कारण सूत्रसंचालक हा सूत्रसंचालन एका भाषेत जरी तरी करत असला तरी वेगवेगळ्या भाषेतील अवतरणांचा वापर मात्र तो करू शकतो. तर अशा पद्धतीने ज्यावेळी अवतरणांचा वापर केला जातो त्यावेळी एक गोष्ट मात्र आपल्याला लक्षात घ्यावी लागते. सूत्रसंचालक म्हणून आपण प्रेक्षकांच्या परीचयाची जी आहेत ती अवतरणं प्रामुख्यानं वापरावीत. जी भाषा जी आहे जी प्रेक्षकांची असेल अशी भाषा आपण वापरणं गरजेचं आहे. ज्या प्रदेशात सूत्रसंचालन करणार असाल त्या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषांची पार्श्वभूमी लक्षात घेणं गरजेचं आहे. उदाहरणार्थ गोव्यामध्ये वेगवेगळ्या भाषा ज्या आहेत त्या सुपरिचित आहेत. गोव्यातील माणसं हिंदी बोलतात, कोंकणी बोलतात, मराठी बोलतात, इंग्रजीही बोलतात. ह्या सगळ्या भाषा ज्या आहेत त्या परिचयाच्या आहेत. त्यामुळे ह्या गोव्यातील माणसांना, प्रेक्षकांना ह्या सगळ्या भाषा ज्या आहेत त्या

परिचयाच्या असतात. ह्याची दक्षता जी आहे ती आपण घेणं गरजेचं आहे. कार्यक्रमात रसिक-प्रेक्षक कोण आहेत त्याचे भान आपल्याला ठेवावं लागतं. प्रेक्षकांचं स्वरूप कसं आहे, प्रेक्षक कोणत्या स्वरूपाचे आहेत हे आपल्याला लक्षात घ्यावे लागतात. कोणती भाषा जी आहे ते बोलतात ह्याच्याकडे आपण लक्ष देणे गरजेचे आहे. वर्तमानपत्र सामाजिक माध्यमातून दूरदर्शनवर, आकाशवाणीवर, अवतरणे ऐकली वाचली पाहिली असतील तर त्याचं संकलन करून ठेवावं हे अत्यंत महत्त्वाचं आहे. आपण वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे सुविचार ऐकतो, अवतरणे वाचतो, बघतो परंतु त्याचे संकलन करणे मात्र आपण करून ठेवत नाही. ऐन वेळेला सूत्रसंचालन चालू असाताना आपण ह्या गोष्टी करू शकत नाही.आपल्याला सगळ्या गोष्टी ज्या आहेत त्या आठवण राहत नाहीत. त्यामुळे काय करावं तर वर्तमानपत्रातील सामाजिक माध्यमातून म्हणजे सोशल मिडीयावर जे काही कॉन्टेक्टस् असतात, जे काही वेगवेगळ्या पेजवर तुम्ही व्हिजीट करता तिथे वेगवेगळे विचार तुम्हाला वाचायला मिळतात. हे सगळे विचार जे आहेत ते तुम्ही संकलित स्वरूपात तुमच्याकडे  ठेवणे गरजेचे आहे. आणि ह्यासाठी काय करावं की एक छोटीशी वही जी आहे ती बाळगणं गरजेचं आहे. एखाद्या छोट्याशा डायरीमध्ये तुम्ही जे काही वाचता कुठेतरी तुम्हाला काही तरी मिळतं कुठेतरी कात्रणंसुद्धा काढून स्टिक करू शकता, लावू शकता किंवा तुमच्या स्वतःच्या हातानं ते लिहून नमूद करून ठेऊ शकता.

तर ही काही उदाहरणे आहे. मराठी उदाहरणं इथं दिलेली आहेत. तर ती तुम्ही पाहू शकता

- जे जे आपणासी ठावे ते  इतरांसि द्यावे। शहाणे करून सोडावे सकळजन। किंवा
- विचारेविण बोलो नये। विवंचनेविण चालो नये। असे समर्थ रामदास म्हणतात.

हि जी अवतरणे आहेत अशा स्वरूपाची अवतरणे तुमच्याकडे संकलित करून ठेवणे गरजेचं आहे. अजूनही ज्यांना कुणाला अवतरणे ह्या शब्दाचा इंग्रजी पर्यायी शब्द माहित नसेल तर त्याचा अर्थ Quotations.

तर ही आहेत काही कोंकणीमधली

- मळबांतलें नकेत्र जावप जमलें ना, तरी दिवो जावन उजवाड घालूंक जाय.
- मोती जावन भांगरा वांगडा रावचे परस उदका थेंब जावन कोणाचीय तान भागोवप सदांच बरें.
- एक वात...उज्यान स्वताक जळोवन दुसऱ्यांक उजवाडाची किर्णां दितात

  त्यानंतर हिंदी काही अवतरणे दिलेली आहेत. तुमच्यासमोर आहेत. तुम्ही बघु शकता.

  **साँच बराबर तप नही, झूठ बराबर पाप।**

  **जाके हिरदे साँच है, ताकि हिरदै आप।।**

  त्यानंतर त्याचा मराठी अर्थही दिलेला आहे. तुम्हाला हवा असल्यास तुम्ही समजून घेऊ शकता.

त्यानंतर दुसरे एक उदाहरण दिलेले आहे. तर ही काही हिंदितली अवतरणे आहेत. आणि यानंतर हिंदितील शेरोशायरी ज्या आहेत ते इथे दिलेल्या आहेत. अनेक वेळेला असं होतं की हिंदी अवतरणांपेक्षा शेरोशायऱ्या ज्या आहेत त्या सूत्रसंचालकांने जर वापरल्या तर प्रक्षकांकडून बरीच दाद मिळते. बऱ्याच टाळ्या ज्या आहेत त्या मिळत असतात. तर जे आपण अनेक वेळेला बघितलेलं आहे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरणाऱ्या शेरोशायरी ज्या आहेत त्या सूत्रसंचालक वापरत असतात.

ही काही इंग्रजी अवतरणे आहेत. बघू शकता. तर कशा स्वरूपाचे तुम्ही संकलन करू शकता ते बघा. त्यासाठी ही उदाहरणे आहेत. जी मघाचपासून मी देते. मराठीतील आहेत कोंकणीतील आहेत हिंदितील आहेत. अशी असंख्या अवतरणे जी आहेत ती तुम्हाला पुस्तकाच्या माध्यमातून सोशल मिडीयाच्या माध्यमातून मिळू शकतात. तर  त्याचं संकलन जे आहे ते करणं गरजेचं आहे.तर हे केवळ संकलन करून भागत नाही तर पाठांतर चिंतन याचीही तेवढीच जी आवश्यकता जी आहे ती त्याच्यासाठी लागते. अवतरणाची संकलनाची आवड हवीच परंतु पाठांतर जे आहे ते करणं गरजेचं आहे. त्यामुळे काय होतं की संहिता लेखन म्हणजे सूत्रसंचालनासाठी जी आपण स्क्रिप्ट तयार करतो त्यावेळी मांडणीसाठी उपयुक्त ठरतं. पाठांतर करताना अवतरणांचा अर्थही समजून घ्यावा. काहीवेळेला पाठांतर केलेल्या सुभाषिताचा अवतरणाचे विश्लेषण करणं गरजेचं असतं.  वापरणाऱ्या अवतरणांवर कार्यक्रमाअगोदर चिंतन व  मनन करावं  . तर त्यावरनंच आपण पुढे विश्लेषण करू शकतो.  चिंतन मनन झालं नाही तर फक्त आपण पाठांतर करतो आणि पोपटपंची केल्यासारखं आपण बोलत राहतो. जे चुकीचं आहे. सूत्रसंचालकाला हे गुण जे आहेत ते आपल्या अंगी बाळगणं गरजेचं आहे. पाठांतरही करणं, चिंतन आणि मनन करणं आवश्यक आहे.

तर हे काही संदर्भ आहेत. हे संदर्भ दिलेले आहेत त्या संदर्भाच्या माध्यमातून  तुम्ही इतर अवतरणे आहेत किंवा सुभाषिते चारोळ्या आहेत त्याचे संकलन तुम्हाला तिथे मिळू शकतं. ही पुस्तकं जी आहेत ती तुम्ही वापरू शकता.

अगदी शेवटी मी एवढंच सांगेन की,

आम्हा घरी धन शब्दांचिच रत्ने।

शब्दांचिच शस्त्रे यत्न करू।।

हा अभंग जे आहे तो संत तुकारामांचा आहे. नेमकं मला हेच सांगायचे आङे की सूत्रसंचालक जो आङे त्याला शब्दांचे भांडार जे आहे ते भरपूर वाढवणं गरजेचं आहे. तुमच्या घरीच शब्दांची रत्ने जी आहेत ती असणं गरजेची आहेत शब्दांचीच शस्त्रे जी आहेत ती तुम्हाला बाळगायची आहेत. आणि पुढे शब्दांचे खूप चांगल्या पद्धतीने वर्णन तुकारामांनी केलेले आहे. मुद्दामहून हा अभंग जो आहे तो लक्षपूर्वक वाचा मग तुमच्या लक्षात येईल एकंदरीत मला या पूर्ण चर्चेच्या माध्यमातून काय सांगयचं. की तुमचं शब्द धान्य शब्द धन जे आहे ते वाढवा. शब्दांची श्रीमंती जी आहे ती वाढवणं सूत्रसंचालकाला अत्यंत महत्त्वाची आहे.

धन्यवाद.